विभाग :- बांधकाम विभाग
दिनांक २६/०६/२०२५

विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती "एच" कार्यक्षेत्रातील आरोग्य आयुष्यमान मंदिरअंतर्गत वॉर्ड क्र. 85 मध्ये साई गार्डन बिल्डींग येथे कंटेनर ठेवण्यासाठी बांधकाम करणे कामी आयुक्त तथा प्रशासक हयांची आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती "एच" कार्यक्षेत्रातील आरोग्य आयुष्यमान मंदिरअंतर्गत वॉर्ड क्र. 85 मध्ये साई गार्डन बिल्डींग येथे कंटेनर ठेवण्यासाठी बांधकाम करणे

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.९,९३,७४२/-

प्रस्तावाची गरज :- वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती "एच"कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ८५ मध्ये साई गार्डन बिल्डींग येथे आयुष्य आरोग्यमान दवाखाना तयार येणार आहे. सदर दवाखाना कंटेनर मध्ये सुरु करण्यात येणार आहे. सदर कंटेनर जवळ पाणी साचू नये यासाठी प्लीथ बांधणे आवश्यक आहे सदर कामाची प्रत्यक्ष पाहणी करुन रक्कम रु. ९,९३,७४२/- इतके अंदाजपत्रक तयार करणेत आलेले आहे.

सदर काम तातडीने हाती घेऊन पूर्ण करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन शुद्धीपत्रकक्र.सी.ए.टी-०१/२०१५/प्र.क्र.२०/ इमा.२ दि.२९/७/२०२१ नुसार रु. १० लक्ष पर्यतची कामे मजुर सहकारी संस्था किंवा सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांच्यामार्फत करण्यास मुभा देण्यात आलेली आहे.

कामाचे स्वरुप :- अंतर्गत कामे - सोलींग, पी.सी.सी ,वीट बांधकाम
परिमाण - फाऊंडेशन – १७.५० X १०.५० क्षेत्र

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६७ (३) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक हयांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस प्रस्ताव सविनय सादर.

कामाबाबतचे बाबनिहाय वेळापत्रक

अ.क्र.	बाब	अपेक्षित दिनांक
१	प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव	सक्षम प्राधिकरणाकडुन मंजुरी मिळाल्यानंतर तात्काळ
२	निविदा प्रसिध्दी/मजुर संस्थेकरीता पत्र देणे	२६/०३/२०२५
३	प्रथम लखोटा उघडणे / मजुर संस्था मंजुरी	२८/०३/२०२५
४	व्दितीय लखोटा उघडणे	-
५	संविदा मंजूरी ठराव	१०/०४/२०२५
६	करारनामा करणे कार्यादेश देणे	१७/०४/२०२५
७	काम सुरु करणे	२१/०४/२०२५
८	काम पूर्ण करणे	२०/०५/२०२५
९	देयक सादर करणे	२६/०५/२०२५
१०	देयकांचे प्रदान करणे.	३०/०५/२०२५
११	उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे	०५/०६/२०२५

तरी प्रभाग समिती एच कार्यक्षेत्रातील आरोग्य आयुष्यमान मंदिर अंतर्गत वॉर्ड क्र. 85 मध्ये साई गार्डन बिल्डींग येथे कंटेनर ठेवण्यासाठी बांधकाम करणे कामी बांधकाम विभागामार्फत चालू राज्य दर सुची सन २०२२-२३ नुसार तयार केलेल्या रक्कम रु.९,९३,७४२/- अंदाजपत्रकास मा. आयुक्त तथा प्रशासक सो. ह्यांची प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेस सविनय सादर.

ठराव :- सदर काम खालील नमुद कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

अ.क्र.	बाब	अपेक्षित दिनांक
१	प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव	सक्षम प्राधिकरणाकडुन मंजुरी मिळाल्यानंतर तात्काळ
२	निविदा प्रसिध्दी	२६/०३/२०२५
३	प्रथम लखोटा उघडणे	२८/०३/२०२५
४	व्दितीय लखोटा उघडणे	-
५	संविदा मंजूरी ठराव	१०/०४/२०२५
६	करारनामा करणे कार्यादेश देणे	१७/०४/२०२५
७	काम सुरु करणे	२१/०४/२०२५
८	काम पूर्ण करणे	२०/०५/२०२५
९	देयक सादर करणे	२६/०५/२०२५
१०	देयकांचे प्रदान करणे.	३०/०५/२०२५
११	उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे	०५/०६/२०२५

सदर कामाकरिता नमुद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास संबंधित विभाग प्रमुख व त्यांचे अधिनस्त कर्मचारी हा MCSR १९७९ प्रमाणे कार्यवाहीस पात्र राहतील .तसेच सदर कामामध्ये काही अपरिहार्य कारणास्तव ,तांत्रीक नैसर्गिक व इतर सबक कारणास्तव विलंब झाल्यास त्या त्या वेळी-विलंबास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घणे बंधनकारक राहील .तरी वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "एच" कार्यक्षेत्रातील आरोग्य आयुष्यमान मंदिर अंतर्गत वॉर्ड क्र. 85 मध्ये साई गार्डन बिल्डीग येथे कंटेनर ठेवण्यासाठी बांधकाम करणे कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ९,९३,७४२/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय तक्या मंजुरी देणेत येत आहेसदर काम तातडीने हाती घेऊन पूर्ण करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन शुध्दीपत्रक क्र.सी.ए.टी.-०१/२०१५/प्र.क्र.२०/इमा. २ दि. २९/०७/२०२१ नुसार रु. १० लक्ष पर्यंतची कामे मजुर सहकारी संस्था किंवा सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांच्यामार्फत करण्यास मुभा देण्यात आलेली आहे. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे .सदर कामी तांत्रीक मान्यता घेऊन सदर काम मजुर संस्था किंवा सुशिक्षित बेकार अभियंता यांचे मार्फत करणेस मान्यता देणेत येत आहे.तसेच Estimate मधील प्रत्येक टप्प्यावर केलेल्या कामाचे Geotagged फोटोग्राफ्स सादर करणेत यावे . तद्नंतरच कामाची रक्कम अदा करणेत यावी.

अनिलकुमार पवार (भा.प्रसे.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार ता.वसई, जि.पालघर
पिन - ४०१३०५ दुरध्वनी क्र.०२५०-२५२५१०१
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

ठराव क्र . ८७१

बांधकाम विभाग
दिनांक :२६/६/ २०२५

प्रस्तावाचा विषय - प्रभाग समिती एफ पेल्हार क्षेत्रातील प्रभाग क्र ४१ मध्ये सुरेंद्र गुप्ता ते कन्हैया यादव येथे पाईप क्रॉसिंग करणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करणेस मान्यता मिळणे बाबत.

अंदाजपत्रकीय रक्कम	:-	रु. २,७१,१५४/-
तांत्रिक मान्यता अंती रक्कम		२,७०,०१५/-
प्रशासकीय मंजूरी	:-	मा.आयुक्त तथा प्रशासक यांचा ठराव क्र १९९० दि.१५/०१/२०२५
तांत्रिक मंजुरी	:-	कार्यकारी अभियंता पु.क्र. F-१ पृ.क .८/४९ दि. २०/०१/२०२५
नोटीस बोर्ड द्वारे निविदा प्रसिद्धी	:-	वविशम/बांध/१०/२०२५-२६ दि. २५/०४/२०२५ अति.आयुक्त - वसई विरार शहर महानगरपालिका
निविदा प्रसिध्दी दिनांक (नोटीस बोर्ड)	:-	दि.१५/०४/२०२५
निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख		दि.२२/०४/२०२५
विहित मुदतीत प्राप्त निविदा	:-	०३
ई — टेण्डरींग व्दारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा)	:-	दि.२५/०४/२०२५
ई - टेण्डरींग व्दारे निविदा उघडण्याची दिनांक (द्वितीय लखोटा)		दि. ३०/०४/२०२५
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी	:-	उप अभियंता
लखोटा क्र. २ उघडण्यासाठी मा. निविदा समितीने दि. ३०/०६/२०२५ शिफारस केली आहे.		

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

अ.क्र.	निविदा धारकाचे नाव	निविदा दर अंदाजपत्रकिय दरापेक्षा
१.	**मे.सी.एस.मोहीते**	**अंदाजपत्रकीय दराने**
२	मे.ओम गणेश कंन्ट्रक्शन	(+) १.०० % जास्त दराने
३.	मे. कांबळे अनस झाकीर	(+) ०.९९ % जास्त दराने

सदर कामी लघुत्तम निविदा धारकाबरोबर करारनामा करुन कार्यादेश देणे, काम सुरु करुन विहीत मुदतीत पुर्ण करणे व देयक सादर करणे इ.सर्व प्रक्रीया नमुद कालमर्यादेत पुर्ण होणे अपेक्षित आहे.

अ.क्र.	बाब	अपेक्षित दिनांक
१.	प्रशासकीय व वित्तीय मान्यतेचा ठराव	१५/०१/२०२५
२.	निविदा प्रसिध्द करणे	२९/०३/२०२५
३.	प्रथम लिफाफा उघडणे	२५/०४/२०२५
४.	द्वितीय लिफाफा उघडणे	३०/०४/२०२५
५.	संविदा मंजुर ठराव	१८/०६/२०२५
६.	कार्यादेश देणे / करारानामा करणे	२३/०६/२०२५
७.	काम सुरु करणे	२६/०६/२०२५
८.	काम पुर्ण करणे	१७/१०/२०२५ (पावसाळा वगळुन)
९	देयक सादर करणे	२५/१०/२०२५
१०.	देयकाचे प्रदान करणे	०५/११/२०२५

उपरोक्त निविदांची तुलना केली असता **मे .सी. एस.मोहिते** यांच्या निविदेतील **अंदाजपत्रकीय दराने** हा दर तुलनात्मकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी आहेत.

तरी **मे .सी. एस.मोहिते** यांच्या **अंदाजपत्रकीय दराने** निविदेस दि.३०/०४/२०२५ रोजी निविदा समितीने शिफारस करण्यात आलेली आहे.

तरी **मे.सी.एस.मोहिते** यांच्या निवेदेतील **अंदाजपत्रकीय दराच्या** निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार संविदा करण्यास मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेस्तव सादर.

ठराव निर्णय :- सदर काम खालील नमुद कालावधीत पुर्ण होणे अपेक्षित आहे.
सदर कामाकरीता उपरोक्त नमुद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्याने संबंधित अधिकारी व त्याचे अधिनिस्त कर्मचारी MCSR १९७९ प्रमाणे कार्यवाहीस पात्र राहतील प्रस्तावित कालमर्यादेत तांत्रिक अथवा प्रशासकीय कारणास्तव तसेच नैसर्गिक आपत्ती व इतर अपवादात्मक परिस्थितीमुळे विलंब झाल्यास नमुद कारणासह सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेणे बंधनकारक राहील.

अ.क्र.	बाब	अपेक्षित दिनांक
१.	प्रशासकीय व वित्तीय मान्यतेचा ठराव	१५/०१/२०२५
२.	निविदा प्रसिध्द करणे	२९/०३/२०२५
३.	प्रथम लिफाफा उघडणे	२५/०४/२०२५
४.	द्वितीय लिफाफा उघडणे	३०/०४/२०२५
५.	संविदा मंजुर ठराव	१८/०६/२०२५
६.	कार्यादेश देणे / करारानामा करणे	२३/०६/२०२५
७.	काम सुरु करणे	२६/०६/२०२५
८.	काम पुर्ण करणे	१७/१०/२०२५ (पावसाळा वगळुन)
९.	देयक सादर करणे	२५/१०/२०२५
१०.	देयकाचे प्रदान करणे	०५/११/२०२५

वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती एफ पेल्हार क्षेत्रातील प्रभाग क्र ४१ मध्ये सुरेंद्र गुप्ता ते कन्हैया यादव येथे पाईप क्रॉसिंग करणे कामी **मे.सी.एस.मोहीते** यांच्या **अंदाजपत्रकीय दराची** निविदा ही इतर निविदेच्या तुलनेत योग्य व वाजवी असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये सदर निविदेस संविदा करणेस व नामंजुर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देत आहे तसेच त्या अनुषंगाने येणा-या इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देत आहे. तथापी अंदाजपत्रकामधील प्रत्येक टप्प्यावरील कामाचे जीओ टॅग (Geo Tagged) छायाचित्र सादर करणे आवश्यक राहील तदनंतरच कामाचे देयक अदा करणेत यावे.

26/06

अनिलकुमार पवार (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पश्चिम, जि. पालघर, पिन न. ४०१ ३०३
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ८७२

विभाग :- भांडार विभाग
दिनांक : २६/०६/२०२५

विषय :- सन २०२४/२५ ते सन २०२५/२६ या वित्तीय वर्षाकरिता वसई विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवरील सध्या कार्यरत असलेल्या वर्ग ४ (सफाई कामगार) कर्मचाऱ्यांकरीता गणवेश पुरवठा करणेकामी ई-निविदेमधील कमी दरांच्या ई-निविदाकारासोबत संविदा करण्यांस मान्यते बाबत.

सन २०२४/२५ ते सन २०२५/२६ या वित्तीय वर्षाकरिता वसई विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवरील सध्या कार्यरत असलेल्या वर्ग ४ (सफाई कामगार) कर्मचाऱ्यांकरीता गणवेश पुरवठा करणेकामी (टेंडर क्रं. २०२५_VVCMC_११७५२०८_१) https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर जा.क्रं.वविशम/भांडार/३७९/२०२५ दि. २८.०४.२०२५ रोजीची जाहिर ई-निविदा सुचना (भांडार विभाग) प्रसिध्द करुन दि. ०९.०५.२०२५ रोजी दु. ३.०० वाजेपर्यंत ई-निविदा मागविण्यांत आल्या होत्या. उपरोक्त मुदतीत ०३ ई-निविदा प्राप्त झाल्या. निविदाकारांचे अ.क्रं.१ चे तांत्रिक बाबींचे लिफाफे दि. १३.०५.२०२५ रोजी दुपारी १०.४७ मिनिटांनी उघडण्यात आले. व अ.क्रं. २ चे वित्तिय बाबींचे लिफाफे दि. २६.०५.२०२५ रोजी दुपारी १२.४६ मिनिटांनी उघडण्यात आले. पात्र १) मे. वरुन टेक्सटाईल्स २) मे. हरजीत कलेक्शन ३) मे. एम.के.शहा इंटरप्राईजेस या ०३ (तीन) निविदाकारांच्या ई-निविदेतील दर अधिकचे वाटत असल्याने या तीनही निविदाकारांचे दर बंद पाकिटातून वाटाघाटी करणेकामी दि. ३०/०५/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत भांडार विभाग, मुख्य कार्यालय मागविण्यात आले होते. वाटाघाटी अंती प्राप्त झालेले दर खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र.	साहित्याचा तपशिल	परिमाण	मे. वरुन टेक्सटाईल्स	मे. हरजीत कलेक्शन	मे. एम.के.शहा इंटरप्राईजेस	वाटाघाटी अंती प्राप्त दर
			मुळ किंमत वस्तू व सेवा करासहित तुलनात्मक तक्ता			
१.	पुरुष कर्मचाऱ्यांकरिता अर्ध्या बाहयांचे बुश शर्ट शुर्टींग कपडा ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन व लांब विजार (फुल पॅन्ट) शुर्टींग कपडा ६७% पॉलिस्टर, ३३% कॉटन वापरुन शिलाईसह म.न.पा.चे नाव व कर्मचारी पद छपाईसह गणवेश पुरविणे.	पुरुष कर्मचारी प्रती नग गणवेश (एक पॅन्ट व एक शर्ट गणवेश जोड)	१५५०	१५५०	१५८०	१५३५
२.	स्त्री कर्मचाऱ्यांकरिता ६७% पॉलिस्टर व ३३% कॉटन ५ मीटर फिकट निळया रंगाची काळी किनार असलेली साडी, फॉल बिडींगसह पुरविणे व ४८% पॉलिस्टर व ५२% कॉटन कपडा वापरुन शिलाईसह ब्लॉऊज व कॉटन परकरसह स्त्री गणवेश पुरविणे.	स्त्री कर्मचारी प्रती नग गणवेश	१३२१	१३१०	१२९०	१२८०

मे. वरुन टेक्सटाईल्स व मे. हरजीत कलेक्शन :- घटक क्र. १
मे. एम.के.शहा इंटरप्राईजेस :- घटक क्र. २

सन २०२४/२५ ते सन २०२५/२६ या वित्तीय वर्षाकरिता वसई विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवरील सध्या कार्यरत असलेल्या वर्ग ४ (सफाई कामगार) कर्मचाऱ्यांकरीता गणवेश पुरवठा करणेकामी मागविण्यात आलेल्या ई-निविदेमधील वरील प्रमाणे तुलनात्मक दराची पडताळणी केली असता वाटाघाटी अंती प्राप्त झालेले न्युनतम दर योग्य व वाजवी आहेत. सदर न्युनतम दरांना निविदा समितीने दि. १७/०६/२०२५ रोजी मंजुरीस शिफारस देण्यात आलेली आहे.

तरी १) मे. वरुन टेक्सटाईल्स २) मे. हरजीत कलेक्शन ३) मे. एम.के.शहा इंटरप्राईजेस ०३ (तीन) निविदाकारांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार निविदाकारांसोबत संविदा करणेस व सन २०२४/२५ ते सन २०२५/२६ या वित्तीय वर्षाकरिता वसई विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवरील सध्या कार्यरत असलेल्या वर्ग ४ (सफाई कामगार) कर्मचाऱ्यांकरीता गणवेश पुरवठा करणेकामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु २० लक्ष खर्चास वित्तीय मंजुरीस्तव व पुढील आदेशास्तव सविनय सादर.

प्रस्तावाचा निर्णय :- सन २०२४/२५ ते सन २०२५/२६ या वित्तीय वर्षाकरिता वसई विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवरील सध्या कार्यरत असलेल्या वर्ग ४ (सफाई कामगार) कर्मचाऱ्यांकरीता गणवेश पुरवठा करणेकामी मागविण्यात आलेल्या ई-निविदेमधील तुलनात्मक दराची पडताळणी केली असता प्राप्त झालेले व वाटाघाटी नंतर अंतिम केलेले न्युनतम दर योग्य व वाजवी आहेत. सदर न्युनतम दरांना निविदा समितीने दि. १७/०६/२०२५ रोजी मंजुरीस शिफारस देण्यात आलेली आहे.

तरी १) मे. वरुन टेक्सटाईल्स २) मे. हरजीत कलेक्शन ३) मे. एम.के.शहा इंटरप्राईजेस ०३ (तीन) निविदाकारांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार निविदाकारांसोबत संविदा करणेस सन २०२४/२५ ते सन २०२५/२६ या वित्तीय वर्षाकरिता वसई विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवरील सध्या कार्यरत असलेल्या वर्ग ४ (सफाई कामगार) कर्मचाऱ्यांकरीता गणवेश पुरवठा करणेकामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु २० लक्ष खर्चास वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

26/06

अनिलकुमार पवार (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्यकार्यालय, विरार (पश्चिम), जि.पालघर, पिन नं. - ४०१३०३

प्रशासकीय ठराव क्र. : ८७३ **विभाग :- सामाजिक न्याय विभाग**

दिनांक :- २६/०६/२०२५

प्रस्तावाचा विषय :- समाजिक न्याय विभागामार्फत महानगरपालिका हद्दीतील कुष्ठरोग बाधीत पुरुष, पुरुष डायलेसिस, १८ ते २१ वयोगटातील अनाथ मुलांना उपजिविकेकरीता अर्थसहाय्य देणे कामी मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :- उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत महानगरपालिका हद्दीतील कुष्ठरोग बाधीत पुरुष रुग्णांना प्रती माह अर्थसहाय्य,पुरुष डायलेसिस यांस प्रती डायलेसिस खेप अर्थसहाय्य व १८ ते २१ वयोगटातील अनाथ मुलांना प्रती माह उपजिविकेरीता अर्थसहाय्य महिला व बालकल्याण विभागामार्फत देण्यात येत होते.

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागामार्फत २९ मार्च, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये महिला व बालकल्याण विभागामार्फत पुरुषांकरिता कोणताही खर्च न करण्याच्या सूचना आहेत.त्यानुसार महिला व बालकल्याण विभागाने सादर केलेल्या टिपणीनूसार मा.अतिरिक्त आयुक्त यांनी पुरुषांकरीताच्या योजना समाजिक न्याय विभागामार्फत अनुदान वितरीत करण्याबाबत निर्देश दिले आहेत.त्यानूसार कुष्ठरोग बाधीत पुरुष रुग्णांना अर्थसहाय्य, पुरुष रुग्णांना डायलेसिस उपचारा करीता अर्थसहाय्य, १८ ते २१ वयोगटातील अनाथ मुलांना उपजिविकेकरीता अर्थसहाय्य इ. योजना समाजिक न्याय विभागामार्फत खालीलप्रमाणे अटी व शर्ती नुसार सुरु करण्यात यावे.

१. योजनेचा उद्देश :-

अ.क्र.	योजनेचे नाव	योजनेचा उद्देश
१.	महानगरपालिका हद्दीतील कुष्ठरोग बाधीत पुरुष रुग्णांना उदरनिर्वाह करीता प्रती माह अनुदान देणे.	कुष्ठरोग बाधीत रुग्णांना उपचारा करिता आर्थिक मदत करणे.
२.	महानगरपालिका हद्दीतील डायलेसिस उपचार घेणाऱ्या पुरुष रुग्णांना प्रती खेप अर्थसहाय्य देणेबाबत.	डायलेसिस रुग्णांना उपचारा करिता आर्थिक मदत करणे.
३.	अनाथ मुलांना उपजिविकेकरीता प्रती माह अर्थसहाय्य देणेबाबत.	अनाथ मुलांना त्यांच्या दैनंदिन उपजिविकेकरीता मदत करुन त्यांच्या सशक्तीकरणास चालना देणे.

योजनेचे स्वरुप :-

अ.क्र.	योजनेचे नाव	योजनेचे स्वरुप
१.	महानगरपालिका हद्दीतील कुष्ठरोग बाधीत पुरुष रुग्णांना उदरनिर्वाह करीता अनुदान देणे.	पात्रता कालावधी दरम्यान प्रत्येक पात्र लाभार्थ्यांना थेट लाभ हस्तांतरण सक्षम बँक खात्यात दरमहा रु.३,०००/-प्रमाणे वार्षिक ३६०००/- रुपये इतकी रक्कम दिली जाईल.
२.	महानगरपालिका हद्दीतील डायलेसिस उपचार घेणाऱ्या पुरुष रुग्णांना अर्थसहाय्य देणेबाबत.	प्रती खेप पात्र लाभार्थ्यांस रु.३५०/- इतकी रक्कम डायलेसिस घेत असलेल्या संस्थेच्या नावे दिली जाईल.

३.	अनाथ मुलांना उपजिविकेकरीता अर्थसहाय्य देणेबाबत.	पात्रता कालावधी दरम्यान प्रत्येक पात्र लाभार्थ्यांना थेट लाभ हस्तांतरण सक्षम बँक खात्यात दरमहा रु.२,०००/-प्रमाणे वार्षिक २४०००/- रुपये इतकी रक्कम दिली जाईल.

३. योजनेचे लाभार्थी :-

अ.क्र.	योजनेचे नाव	योजनेचे लाभार्थी
१.	महानगरपालिका हद्दीतील कुष्ठरोग बाधीत पुरुष रुग्णांना उदरनिर्वाह करीता अनुदान देणे.	१४ वर्षावरील पुरुष
२.	महानगरपालिका हद्दीतील डायलेसिस उपचार घेणाऱ्या पुरुष रुग्णांना अर्थसहाय्य देणेबाबत.	१४ वर्षावरील पुरुष
३.	अनाथ मुलांना उपजिविकेकरीता अर्थसहाय्य देणेबाबत.	१८ ते २१ वयोगटातील अनाथ मुले

४. योजनेच्या लाभार्थ्यांची पात्रता :-

(१) लाभार्थी महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असणे आवश्यक आहे.

(२) लाभार्थी वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील रहिवाशी असणे आवश्यक आहे.

५. सदर योजनेमध्ये लाभ मिळण्याकरिता खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहेत:-

अ.क्र.	योजनेचे नाव	आवश्यक कागदपत्रे
१.	महानगरपालिका हद्दीतील कुष्ठरोग बाधीत पुरुष रुग्णांना उदरनिर्वाह करीता अनुदान देणे.	१.रेशनकार्ड किंवा संस्थेचे रेशनकार्ड २.घरपट्टी पावती (संस्थेत राहत असल्यास घरपट्टी ची आवश्यकता नाही. ३. आधारकार्ड ४.वयाचा दाखला/शाळा सोडल्याचा दाखला/पॅनकार्ड ५.नगरसेवक /वॉर्ड सहा.आयुक्त यांचे रहिवाशी दाखला. ६.कुष्ठरोग बाधीत असल्याबाबत वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचा दाखला. ६.लाभार्थ्याचे बँक पासबुक झेरॉक्स. ८.स्वयं घोषणापत्र.
२.	महानगरपालिका हद्दीतील डायलेसिस उपचार घेणाऱ्या पुरुष रुग्णांना अर्थसहाय्य देणेबाबत.	१.रेशनकार्ड/घरपट्टी २. लाभार्थ्यांचे आधारकार्ड असणे आवश्यक आहे. ३. नगरसेवक /वॉर्ड सहा.आयुक्त यांचे कडील रहिवाशी दाखला. ४. स्वयं घोषणापत्र.
३.	अनाथ मुलांना उपजिविकेकरीता अर्थसहाय्य देणेबाबत.	१.शाळा सोडल्याचा दाखला/जन्माचा दाखला. २.अनाथ असल्याचे संस्थेचे किंवा शासनाचे प्रमाणपत्र ३. लाभार्थ्यांचे आधारकार्ड ४. नगरसेवक /वॉर्ड सहा.आयुक्त यांचे कडील रहिवाशी दाखला. ५.हमीपत्र. ६.बँक पासबुक. ७.स्वयं घोषणापत्र.

६. योजनेची कार्यपध्दती :-

(१) योजनेचे अर्ज महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग समिती कार्यालयात भरले जातील.

(२) भरलेल्या फॉर्म यशस्वीरित्या दाखल केलेल्या अर्जासाठी यथायोग्य पोच पावती दिली जाईल.

(३) अर्ज भरण्याची संपूर्ण प्रक्रिया विनामूल्य असेल.

(४) अर्जदार लाभार्थ्यांने प्रभाग समिती ठिकाणी उपस्थित राहणे आवश्यक असेल.

अ.क्र.	योजनेचे नाव	लेखाशिर्षक व संकेतांक	२०२४-२५ अर्थसंकल्पात मंजुर तरतुद (रु. लाखात)
१	कुष्ठरोग बाधित पुरुष रुग्णांना उपचाराकरीता अनुदान	कुष्ठरोग बाधित पुरुष रुग्णांना कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमांतर्गत उपचार व पोषण भत्ता (म.बा.क.) ६१०-२७४००२	१०.००
२	जेष्ठ पुरुष नागरिक तसेच युवकांसाठी डायलेसिस उपचाराकरीता अनुदान	जेष्ठ पुरुष नागरिकांसाठी डायलेसिस उपचारासह आरोग्य चिकीत्सा शिबिरासाठी म.बा.क. समिती मार्फत खर्च (६१०-२२९१०१)	५०.००
		युवकांसाठी विशेष शैक्षणिक कार्यक्रम, डायलेसिस उपचार, वाचनमाला व स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन, खुल्या प्रवर्गातील दहावी व बारावीमधील गुणानुक्रमे प्रथम दहा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व पारितोषिक, (म.बा.क.) समितीमार्फत शालेय विद्यार्थ्यांना सायकलीचे वाटप तसेच (म.बा.क.) समिती मार्फत सामुदायिक विवाह सोहळया अंतर्गत वर पक्षास अनुदान व इतर युवक कल्याणाच्या योजना (७२०-२७४१),	१३६.००
३	अनाथ/निराधार मुलांना उपजिविकेकरीता अनुदान	निराधार मुलांना म.बा.क. समिती मार्फत उपजिविकेसाठी अर्थसहाय्य (५२१-२७३०)	१०.००

७. सदर योजने करीता प्राप्त होणाऱ्या अर्जांची पडताळणी करणेकामी पडताळणी समिती गठीत करण्यात येत असून सदर समितीची रचना खालीलप्रमाणे आहे :-

<u>पडताळणी समिती :-</u>

अ.क्र.	पदनाम	समितीमधील पदनाम
१	उपायुक्त, सामाजिक न्याय विभाग	अध्यक्ष
२	सहा.आयुक्त,संबंधीत प्रभाग समिती	सदस्य
३	सहा.आयुक्त, सामाजिक न्याय विभाग	सदस्य
४	वरिष्ठ लिपीक,सामाजिक न्याय विभाग	सदस्य
५	अधिक्षक, संबंधीत प्रभाग समिती	सदस्य सचिव

सदर समितीची कार्यपध्दती खालीलप्रमाणे राहील.

१. अर्जदार सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचे विहीत नमुन्यातील भरलेले अर्ज संबंधित लिपिक / वरिष्ठ लिपिक, प्रभाग समिती यांना सादर करतील.

२. लिपिक / वरिष्ठ लिपिक, प्रभाग समिती यांनी सदर अर्जांची छाननी करुन, त्यांची शिफारसीसह मान्यतेसाठी उपरोक्त समितीस सादर करतील.

३. उपरोक्त समिती लिपिक / वरिष्ठ लिपिक, प्रभाग समिती यांनी सादर केलेले अर्जांची पुनश्च: छाननी करुन पात्र लाभार्थींच्या अर्जास मान्यता देतील व पात्र लाभार्थी निश्चित करतील.

४. सदर समितीची बैठक दर महिन्याला आलेल्या अर्जानुसार घेण्यात यावी, लाभार्थ्यांच्या अर्जावर तात्काळ निर्णय घेण्यासाठी आवश्यकतेनुसार महिन्यातुन अधिकवेळा बैठक आयोजित करणेचे अधिकार पडताळणी समिती अध्यक्ष यांना असतील.

१. सर्वसाधारण सभा ठराव क्र.१२,दि.१२/०८/२०१४ अन्वये कुष्ठरोग बाधीत पुरुष रुग्णांना अर्थसहाय्य देण्याकामी मंजूरी देण्यात आली आहे.
२. सर्वसाधारण सभा ठराव क्र.१३, दि.०८/०५/२०१५ अन्वये पुरुष डायलेसीस रुग्णांना अर्थसहाय्य देण्याकामी मंजूरी देण्यात आली आहे.
३. सर्वसाधारण सभा ठराव क्र.१९, दि.२०/०१/२०१६ अन्वये कुष्ठरोग बाधित पुरुष रुग्णांना माहे रु. ३०००/- अनुदान देण्यास व डायलेसिस उपचार घेत असेलेल्या पुरुष रुग्णांना प्रति खेप रु. ३५०/- अर्थसहाय्य देणेकामी मान्यता देण्यात आली आहे.
४. मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.२४८, दि.०५/०९/२०१९ अन्वये १८ ते २१ वयोगटातील अनाथ मुलांना उपजिविकेकरीता प्रति माह रु. २०००/- प्रमाणे वार्षिक रु. २४०००/- अर्थसहाय्य देण्याकामी मंजूरी देण्यात आली आहे.

वरील प्रमाणे नमूद योजनेकरिता अर्थसंकल्पात आवश्यक आर्थिक तरतूदी करण्यात आलेल्या आहेत.त्यानुसार महानगरपालिका हद्दीतील कुष्ठरोग बाधीत पुरुष रुग्णांना प्रती माह अर्थसहाय्य,पुरुष डायलेसिस यांस प्रती डायलेसिस खेप अर्थसहाय्य व १८ ते २१ वयोगटातील अनाथ व निराधार मुलांना प्रती माह उपजिविकेकरीता अर्थसहाय्य इत्यादी योजना सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्याकामी मंजूरी मिळणेबाबत आपल्या मंजूरीस्तव सादर.

ठराव :-

१. महानगरपालिका हद्दीतील कुष्ठरोग बाधीत पुरुष रुग्णांना माह ३०००/- रुपये प्रमाणे वार्षिक ३६०००/- रुपये अर्थसहाय्य.
२. पुरुष डायलेसिस यांस प्रती डायलेसिस खेप ३५०/- रुपये प्रमाणे अर्थसहाय्य.
३. १८ ते २१ वयोगटातील अनाथ व निराधार मुलांना प्रती माह २०००/- प्रमाणे वार्षिक २४०००/- रुपये उपजिविकेकरीता अर्थसहाय्य.

या योजना सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात यावे.

उपरोक्त नमूद योजना प्रस्तावात, योजनेचे स्वरुप, योजनेचे लाभार्थी, योजनेच्या लाभार्थ्यांची पात्रता, योजने करिता आवश्यक कागदपत्रे, योजनेची कार्यपध्दती, योजनेसाठीची तरतूद, पडताळणी समिती नूसार योजना राबविण्यात यावी.

वरील लेखाशिर्षकांतर्गत भागविण्यात येईल. सदर लेखाशिर्ष आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या अर्थसंकल्पा मध्ये रु २,०६,००,०००/- इतकी रक्कमेची तरतुद करण्यात आली आहे. तसेच प्रति वर्ष आवश्यकतेनुसार सदर लेखाशिर्ष नमुद करुन त्याद्वारे खर्च करता येईल.

त्यानुसार कुष्ठरोग बाधीत पुरुष रुग्णांना प्रती माह अर्थसहाय्य, पुरुष डायलेसिस यांस प्रती डायलेसिस खेप अर्थसहाय्य व १८ ते २१ वयोगटातील अनाथ व निराधार मुलांना प्रती माह उपजिविकेकरीता अर्थसहाय्य समाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.तसेच योजनांसोबत त्यांचेशी निगडीत लेखाशिर्ष देखील सामाजिक न्याय विभागास हस्तांतरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

24/01

अनिलकुमार पवार (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्र. ८७४

विभाग :- घनकचरा व्यवस्थापन

दिनांक :- २६/०६/२०२५

प्रस्तावाचा विषय :- नागरी घनकचरा व्यवस्थापन दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई व कचरा संकलन करुन क्षेपणभुमीवर वाहतुक करणेसाठीच्या त्रैवार्षिक निविदेस मुदतवाढ देऊन होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- नागरी घनकचरा व्यवस्थापन हाताळणी अधिनियम २०१६ अन्वये महानगरपालिका अंतर्गत असलेल्या प्रभाग समिती निहाय २० झोनसाठी दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई व कचरा संकलन करुन क्षेपणभुमीवर वाहतुक करणे इत्यादी कामांसाठी सन २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१ या त्रैवार्षिक वर्षाकरिता सर्वसाधारण सभा ठराव क्र.२६ दि.२०/०२/२०१७ रोजी प्रशासकीय मान्यता घेऊन दिनांक ०२/०३/२०१७ रोजी ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.

सदरील निविदेमध्ये आलेल्या दरास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४४९ दिनांक १२/१२/२०१७ अन्वये प्राप्त दरास मान्यता देऊन घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई व कचरा संकलन करुन क्षेपणभुमीवर वाहतुक करणे या त्रैवार्षिक निविदेच्या प्रक्रिये अंतर्गत प्राप्त झालेल्या निविदाधाराकांपैकी कमी दराच्या निविदाकारांच्या दरास मंजूरी देऊन करारनामा करुन कार्यादेश देणेस मंजूरी दिली होती. त्याअनुषंगाने दिनांक ३०/०१/२०१८ रोजी करारनामा करुन दिनांक २०/०२/२०१८ रोजीचा निविदाकारांना कार्यादेश देण्यात आलेला होता. याकामी सन २०१७-१८, सन २०१८-१९ व सन २०१९-२० या त्रैवार्षिक वर्षाकरिता २० झोनमध्ये २० अभिकर्त्यांची नियुक्ती केली असून सदरचे काम १ वर्ष उशिरा सुरू झाल्याने कार्यादेशानुसार सदरच्या कामची मुदत १ वर्ष (सन २०२०-२१ पर्यंत) वाढवून दिलेली होती.

परंतु सदर निविदेचा कालावधी दि.२८/०२/२०२१ रोजी संपुष्टात येत असल्याने प्रशासकीय ठराव क्र.५७८ दि.०८/०३/२०२१ अन्वये पुढील ६ महिन्याकरिता कोणतीही भाववाढ न देता प्रथम मुदतवाढ मंजूर केलेली होती. त्यानंतर प्रशासकीय ठराव क्र.३४७, दि.१२/०७/२०२१ अन्वये सन २०२१-२२ ते सन २०२५-२६ या पाच वर्षाच्या कालावधीकरिता निविन ई-निविदा प्रक्रिया करणेस प्रशासकीय ठराव मंजूर करण्यात आला होता आणि दि. २०/०७/२०२१ रोजी जाहिर ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती.

सदर निविदा प्रक्रिये विरुद्ध विद्यमान ठेकेदार मे. श्री. अनंत इंटरप्रायजेस, मे. रेन्बो कन्स्ट्रक्शन, मे. उजाला लेबर कॉन्ट्रॅक्टर, मे. साई गणेश इंटरप्रायजेस, मे. रिलायबल एजन्सी, मे. हेना इंटरप्रायजेस, मे. मेनदीप इंटरप्रायजेस, मे. शिवम इंटरप्रायजेस यांनी मा. उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली होती. सदर याचिका **"मे. श्री. अनंत एन्टरप्रायझेस व इतर विरुद्ध वसई विरार शहर महानगरपालिका"** मध्ये मा. उच्च न्यायालयात Writ Petition no 4964/2021 मधील Interim Application No.2153/2021 आणि Interim application no.4338/2023 मध्ये खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत.

Sr. No.	Writ Petition no	Order
1	Writ Petition no. 4964/2021order dated 15/09/2021	**a)** In view of the aforesaid statement in the Affidavit-in-Reply, we are of the view that no useful purpose would be served in opening the bids at this juncture and it would be in the fitness of things, that the opening of bids be deferred, in as much as there is likelihood of the election of the Respondent-Corporation being held in the near future and the standing committee of the Respondent - Corporation would be in place. It is required to be noted that the administrator (i.e. Respondent No. 2 Municipal Commissioner) was appointed for the respondent- corporation only because the tenure of the general body of the Respondent-Corporation had expired and election have been postponed due to the covid-19 pandemic. We also note that the tender value is about Rs. 661 crore. **b)** The petitioners/ Respondent -Corporation would be at liberty to move the court to seek further ad- interim relief and/or to vary this order in the event the election are held and /or the six (6) month period of the contracts of the petitioners are to come to an end. All contentions of the parties are kept open for the purpose of the grant or refusal of ad-interim/ interim relief, which may be considered without being influenced by this order. The petition is pending before the hon'ble Court.
2	Interim application no. 2153/2021order dated 14/02/2022	Without prejudice to the rights and contentions of the Applicants/ Petitioners, in as much as the Applicants/ Petitioners have already granted extension of contract for of six months, we permit the Applicants/ Petitioners to make representation for further extension. If such Application is made within four days from today, the same may be decided within two weeks from the date of the representation.
	Representation made by petitioners on dated 23/03/2022	On dated 06/04/2022 order passed, The time limit given by the Hon'ble High Court for the first six months has expired on 28/02/2022 and as the elections have not yet taken place , the time limit has been extended by one month. The decision must be communicated to the High Court.
3	Interim application no.4338/2023 order dated 03/05/2023	The learned counsel for the petitioners, on instructions, submits that the petitioners would avail the remedy before the Arbitrator.

Sr. No.	Writ Petition no	Order
	Arbitration proceeding case no. 1/2 023. order dated 29/12/2023	In view of facts, provision and documents provided on record, the contract period is subsistence for seven years from the date of issue of letter of acceptance and hence the application is allowed. The contract period of the claimant shall be extended for subsequent operating year as per the provisions of contract agreement.

वरीलप्रमाणे न्यायालयीन प्रक्रिया व आवश्यकतेनुसार सदर कामास खालीलप्रमाणे मुदत वाढ देण्यात आली असून त्याचा कारणांसह तपशील पुढीलप्रमाणे आहे.

मुदतवाढ क्र.	ठराव	दिनांक	कालावधी
१	प्रशासकीय ठराव क्र.५७८	०८/०३/२०२१	६ महिने
२	प्रशासकीय ठराव क्र.५२६	२७/०८/२०२१	६ महिने
३	प्रशासकीय ठराव क्र. ०२	०६/०४/२०२२	१ महिने
४	प्रशासकीय ठराव क्र.७५	२२/०४/२०२२	१ वर्ष
५	प्रशासकीय ठराव क्र.३०४२	३१/०३/२०२३	०१/०४/२०२३ ते ३०/०६/२०२३ (३ महिने)
६	प्रशासकीय ठराव क्र.११७०	३१/०७/२०२३	०१/०७/२०२३ ते ३०/०९/२०२३ (३ महिने)
७	प्रशासकीय ठराव क्र.१७७८	२७/०९/२०२३	०१/१०/२०२३ ते ३१/१२/२०२३ (३ महिने)
८	प्रशासकीय ठराव क्र.२८६४	२५/०१/२०२४	०१/०१/२०२४ ते ३१/१२/२०२४ (१ वर्ष)
९	प्रशासकीय ठराव क्र.१९२५	३१/१२/२०२४	०१/०१/२०२५ ते २८/०२/२०२५ (२ महिने)
१०	प्रशासकीय ठराव क्र. २३६०	२८/०२/२०२५	०१/०३/२०२५ ते ३१/०३/२०२५ (१ महिना)
११	प्रशासकीय ठराव क्र. २५९२	२७/०३/२०२५	०१/०४/२०२५ ते ३०/०४/२०२५ (१ महिना)
१२	प्रशासकीय ठराव क्र. १५८	२८/०४/२०२५	०१/०५/२०२५ ते ३०/०६/२०२५ (२ महिने)

सदर ठेक्याच्या कालावधी वर नमुद तक्त्यातील अनु. क्र. ८ नुसार दि.३१/१२/२०२४ रोजी संपुष्टात येत असल्याने नवीन ई-निविदा जाहिर करणे आवश्यक होते. त्याअनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिकेने प्रशासकीय ठराव क्र. १३३२ दि.०९/१०/२०२४ अन्वये सन २०२४-२५, सन २०२५-२६, सन २०२६-२७ ही त्रैवार्षिक निविदा दि.११/१०/२०२४ रोजी जाहीर करण्यात आलेली निविदा प्रशासकीय ठराव क्र. १२९, दि. २३/०४/२०२५ अन्वये रद्द करण्यात आलेली आहे. तद्नंतर वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातंर्गत सन

२०२५-२६, २०२६-२७ व २०२७-२८ या त्रैवार्षिक वर्षाकरिता **प्रभाग समिती ए ते आय** हद्दीतील दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई आणि वर्गीकृत/ विलगीकृत कचरा संकलन करून क्षेपणभुमीवर वाहतुक करणे या कामासाठी सन २०२४-२५, २०२५-२६ व २०२६-२७ या त्रैवार्षिक वर्षाकरिता दिनांक ०९/०५/२०२५ रोजी ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर निविदेचा तांत्रिक लिफाफा दि.२७/०६/२०२५ रोजी उघडण्यात आला असून सदर निविदा प्रक्रिया पुर्ण करून कार्यादेश देणेकामी १ महिन्याचा कालावधी लागू शकतो.

तथापि, दैनंदिन साफसफाई हा अत्यावश्यक सेवेचा भाग असून सदर कामामध्ये खंड पाडणे नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हितावह नाही. तसेच चालू कामाची मंजूर मुदतवाढ दि. ३०/०६/२०२५ पर्यंत असल्याने सद्यस्थितीत चालू असलेल्या कामास १ महिन्याची मुदतवाढ (जुलै अखेरपर्यंत) देणे आवश्यक आहे. याबाबत १ महिन्याची मुदतवाढ (जुलै अखेरपर्यंत) गृहित धरून याकामी येणारा अंदाजित खर्च खालील प्रमाणे गृहीत धरण्यात आलेला आहे.

<u>प्रस्तावित एक महिन्याची मुदतवाढ :-</u>

अ.क्र.	ठेकेदाराचे नाव	प्रभाग समिती	झोन क्र.	मासिक खर्च (मे २०२५)	१ महिन्यासाठी होणारा खर्च (रू)
१	श्री. अनंत इंटरप्रायजेस	A	१	१,६२,६६,२७०/-	१,६२,६६,२७०/-
२	उजाला लेबर कॉन्ट्रॅक्टर	B	२	१,१७,९१,१९७/-	१,१७,९१,१९७/-
३	साई गणेश इंटरप्रायजेस		३	१,५१,२६,३६०/-	१,५१,२६,३६०/-
४	रेन्बो इंटरप्रायजेस	C	४	४९,२५,९१२/-	४९,२५,९१२/-
५	श्री. अनंत इंटरप्रायजेस		५	९७,८८,५८१/-	९७,८८,५८१/-
६	दिनंश बी. संखे	D	६	७०,९६,८१४/-	७०,९६,८१४/-
७	रिलायबल एजन्सी		७	४८,५३,१७७/-	४८,५३,१७७/-
८	हेना इंटरप्रायजेस		८	१,१०,५१,१२०/-	१,१०,५१,१२०/-
९	श्री. अनंत इंटरप्रायजेस	E	९	१,२०,८४,८०७/-	१,२०,८४,८०७/-
१०	साई गणेश इंटरप्रायजेस		१०	६६,१८,९१३/-	६६,१८,९१३/-
११	हेना इंटरप्रायजेस	F	११	५०,२५,९०४/-	५०,२५,९०४/-
१२	उजाला लेबर कॉन्ट्रॅक्टर		१२	६९,७६,७१०/-	६९,७६,७१०/-
१३	उजाला लेबर कॉन्ट्रॅक्टर		१३	७०,१७,४०६/-	७०,१७,४०६/-
१४	रिलायबल एजन्सी	G	१४	४१,५०,८९७/-	४१,५०,८९७/-
१५	शिवम इंटरप्रायजेस		१५	६४,२१,२२५/-	६४,२१,२२५/-
१६	साई गणेश इंटरप्रायजेस		१६	५६,४१,८८०/-	५६,४१,८८०/-
१७	रिलायबल एजन्सी	H	१७	२,०१,६०,९२९/-	२,०१,६०,९२९/-
१८	मनदीप इंटरप्रायजेस	I	१८	८६,१४,३३६/-	८६,१४,३३६/-
१९	आर.बी.इन्फ्रा.प्रो.लि.		१९	५६,९२,०८१/-	५६,९२,०८१/-
२०	दिनेश बी. संखे		२०	४०,२२,९४८/-	४०,२२,९४८/-
एकुण				**१७,३३,२७,४६७/-**	**१७,३३,२७,४६७/-**

वरीलप्रमाणे कामगारांच्या किमान वेतनात डी. ए. मध्ये वाढ होत असते, त्याप्रमाणे संभावित खर्चात वाढ होऊ शकते त्याअनुषंगाने सदर वाढ देय राहील.

तरी, रस्ते सफाई, गटार सफाई, कचरा संकलन करून क्षेपणभूमीवर वाहतुक करणे या कामासाठी नेमणुक केलेल्या अभिकर्त्यांना १ महिन्याची मुदतवाढ दिल्यास अंदाजित रक्कम रू. **१७,३३,२७,४६७/-** इतका खर्च होऊ शकतो.

सदरचा खर्च सन २०२५-२६ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पातील घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अनुदानासह, रस्ता, गटारे, नाले, सार्वजनिक ठिकाणे इ. साफसफाईसाठी घंटागाडी, यांत्रीक झाडू उपलब्ध करणेसह सफाई ठेका व भाड्याच्या वाहनाद्वारे यांत्रिक पद्धतीने नालेसफाई या लेखाशिर्षातील प्रस्तावीत तरतुद रक्कम रू.३५० कोटी मधून भागविणे शक्य आहे.

तरी, दि.०१ जुलै २०२५ ते ३१ जुलै २०२५ पर्यंत अथवा नविन निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन कार्यादेश देणेपर्यंत मुदतवाढ देऊन होणाऱ्या अंदाजित रक्कम रू. **१७,३३,२७,४६७/-** व होणाऱ्या संभावित खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी घनकचरा व्यवस्थापन विभागाने शिफारस केली आहे, त्यानुसार पुढीलप्रमाणे ठराव करण्यात येत आहे.

ठराव निर्णय :- नागरी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई, कचरा संकलन करून क्षेपणभूमीवर वाहतुक करणेसाठीच्या त्रैवार्षिक निविदेस दि.०१ जुलै २०२५ ते ३१ जुलै २०२५ पर्यंत अथवा नविन निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन कार्यादेश देणेपर्यंत मुदतवाढ देऊन होणाऱ्या अंदाजित रक्कम रू. **१७,३३,२७,४६७/-** व होणाऱ्या संभावित खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे.

२१/०८

अनिलकुमार पवार (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (प.), जि. पालघर, पिन नं. ४०१३०३.
दुरध्वनी 0250-2525101/02/03/04/05/06 फॅक्स 0250-2525107.
ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्रं. ८७५

विभाग :- अग्निशमन व आपत्कालीन सेवा
दिनांक :- २६/०६/२०२५

प्रस्तावाचा विषय :- अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागातील 'सॉ कटर मशिन' दुरुस्ती करीता साहित्य खरेदी करणे कामी येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिका,अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागा करीता ७ अग्निशमन केंद्र कार्यरत आहेत. १) मुख्य अग्निशमन केंद्र, आचोळे २) फुलपाडा अग्निशमन केंद्र, विरार (पूर्व) ३) बोळींज अग्निशमन केंद्र, विरार (प.) ४) श्रीप्रस्थ अग्निशमन केंद्र, नालासोपारा (प.) ५) सनसिटी अग्निशमन केंद्र, दिवाणमान, वसई (प.) ६) नवघर अग्निशमन केंद्र, वसई रोड (पूर्व) ७) तामतलाव अग्निशमन केंद्र, वसई गाव. नागरिकांच्या सुरक्षेकरीता सदर अग्निशमन केंद्रामध्ये एकूण ४२ अग्निशमन वाहने कार्यन्वीत आहेत. तसेच एकूण २२६ मनुष्यबळ हे आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना करीता आधुनिक तंत्रज्ञानाने विकसीत असलेल्या अत्याधुनिक साहीत्य, उपकरणासह २४x७ सेवा बजावत आहेत.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये मान्सून काळात तसेच इतर नैसर्गिक आपत्ती, पूर परिस्थिती,चक्री वादळ,प्रचंड वेगाने वाहणारे वारे यामुळे झाडांची पडझड होऊन मोठया प्रमाणात दुर्घटना घडतात. सदर झाडे ही घरावर,इमारतीवर,रस्त्यावर,विजेच्या तारांवर, टांन्सफॉर्मरवर, वाहनांवर इत्यांदींवर पडल्याने नागरिकांच्या जिवीताचे व मालमत्तेचे मोठया प्रमाणत नुकसान होते. प्रसंगी मोठया प्रमाणात वाहतुक कोंडी होते.

सदर पडलेली झाडे ही तत्काळ कापून दूर करणे नितांत गरजेचे असते. यामुळे सदर दुर्घटनेत बाधित झालेल्या व्यक्तिंचे बचाव करणे शक्य होते. सदर अर्धवट तुटलेल्या झाडांच्या फांदया व उन्मळुन पडलेली झाडे हि वाहतूकीची कोंडी व संभाव्य धोका दूर करणे करीता तातडीने कापून बाजुला करण्यासाठी सॉ कटर मशिनची आवश्यकता असते.

सदर सॉ कटर मशिन खरेदी करणे अत्यावश्यक असल्याने आचोळे अग्निशमन केंद्र येथे STIHL सॉ कटर मशिनच्या वितरकांना प्रात्यक्षिक (डेमो) साठी बोलविण्यात आलेले होते. त्यानुसार STIHL कंपनीचे अधिकृत वितरक M/S. Integral safety Engineers, डोंबीवली हे अग्निशमन विभागासाठी उपयुक्त ठरणारे त्यांचेकडील सॉ कटर मशीन उपलब्ध नमुन्यासह प्रात्यक्षिक देणेकरीता आचोळे अग्निशमन केंद्र येथे आलेले होते.

सन २०२४ मध्ये अग्निशमन विभागाकरीता ५० नग सॉ कटर मशिन M/S. Integral safety Engineers, डोंबीवली यांचेकडून खरेदी करण्यात आलेल्या आहेत. त्या मशिनचा वादळवारा, अतिवृष्टी दरम्यान पडलेल्या झाडांच्या वर्दीवर वापर करण्यात आला आहे. सदर मशिन पैकी काही सॉ कटर वारंवार वापरुन नादुरुस्त झाल्या आहेत. त्याबाबत प्र. अग्निशमन केंद्र अधिकारी यांनी अहवाल सादर केला आहे. त्यानुसार मे. इंटेग्रल सेफ्टि इंजिनिअरींग या मुळ उत्पादक कंपनीकडून दुरुस्ती बाबत दरपत्रक मागविले असता पुढील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

Sr. No.	Description	Qty	Rate Including GST 28%	Total
1	MS 250			
	Piston	1 Nos	11400/-	11400/-
	Carburetor Kit	1 Nos	980/-	980/-
2	MS 462			
	Piston	2 Nos	21675/-	43350/-
	Carburetor Kit	2 Nos	580/-	1160/-
3	BG 86 C Piston			
	Piston	2 Nos	3950/-	7900/-
	Carburetor Kit	2 Nos	980/-	1960/-
			Grand Total	66750/-

जून पासून पावसाळा सुरु होत असून अग्निशमन विभागातील कटर मशिन तातडीने दुरुस्त करणे आवश्यक असून सदर सॉ कटर मशिनचे साहित्या खरेदी करणेकामी वस्तु व सेवा करासह एकुण रक्कम रु. ६६,७५०/- खर्च अपेक्षित आहे.

सदर सॉ कटर मशिन खरेदी करणे कामी सन २०२४-२५ सह २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामधील पान नं. ३३ वरील ०५ नंबरचे लेखाशिर्ष **अग्निशमन वाहन दुरुस्ती निगा / कटर मशिन दुरुस्ती निगा** यामध्ये एकुण रक्कम रु. ३ कोटी तरतूद असून सदर खर्च यामधून करता येईल.

तरी वादळी वा-यामुळे महापालिका क्षेत्रात झाडे उन्मळून पडण्याचे प्रकार जास्त घडतात, त्यामुळे सदर सॉ कटर मशिनचे साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे. सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५९ पोटकलम ५ (२) (२) अन्वये विना निविदा अधिकृत विक्रेते मे. इंटेग्रल सेफ्टि इंजिनिअरींग यांचेकडून सदर सॉ कटर मशिनचे साहित्य थेट खरेदी करणेकरिता येणा-या रक्कम रु. ६६७५०/- इतक्या खर्चास मा. आयुक्त सो. यांची प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळणेस सविनय सादर.

ठराव :- सदर कामाकरीता खालील नमूद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास संबंधित अधिकारीव त्यांचे अधिनस्त कर्मचारी MCSR १९७९ प्रमाणे कार्यवाहीस पात्र राहतील. तसेच सदर कामामध्ये काही कारणास्तव (तांत्रिक, नैसर्गिक व इतर सबळ कारणास्तव) विलंब झाल्यास त्या त्या वेळी विलंबास सक्षम प्राधिका-याची मंजूर घेणे बंधनकारक असेल.

अ.क्रं.	तपशिल / बाब	अपेक्षित दिनांक
१	प्रशासकीय व वित्तिय मान्यता ठराव	सक्षम अधिका-याकडून मंजूर मिळाल्यानंतर तात्काळ
२	करारनामा करणे	२९/०५/२०२५
३	कार्यादेश	३०/०५/२०२५
४	काम पुर्ण करणे	१५/०६/२०२५
५	देयक सादर करणे	१६/०६/२०२५
६	देयकाचे प्रदान करणे	२२/०६/२०२५

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागातील सॉ कटर मशिन दुरुस्ती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ (२) (२) अन्वये विना निविदा थेट मे. इंटेग्रल सेफ्टि इंजिनिअरींग यांचेकडून करणे करीता येणा-या रक्कम रु. ६६,७५०/- खर्चास मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

02/06

अनिलकुमार पवार(भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (प), जि.पालघर, पिन.नं.401 303
दुरध्वनी क्र. 2020-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - -0502525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र:- ८७६ विभाग:- बांधकाम विभाग
दिनांक २६/०६/२०२५

विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती "एच" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ९५ मध्ये कौलसिटी आणि चुळणा खलाटीपाडा येथील शौचालय दुरुस्ती करणे कामी मा. आयुक्त तथा प्रशासक हयांची आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती "एच" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ९५ मध्ये कौलसिटी आणि चुळणा खलाटीपाडा येथील शौचालय दुरुस्ती करणे

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. २,९९,१७८/-

प्रस्तावाची गरज :- वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती "एच" कार्यक्षेत्रांतील कौलसिटी आणि खलाटीपाडा येथील शैचालयामध्ये भांडे, दरवाजे, टाईल्स नादुरुस्त झाले असून तेथील नागरीकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे तेथील नागरीक व सदस्य यांनी वारंवार सुचना केलेल्या आहेत. त्यामुळे शौचालयाची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष ठिकाणी पहाणी करुन रक्कम रु. २,९९,१७८/-चे अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

कामाचे स्वरुप :- अंतर्गत कामे — दरवाजे, टाईल्स, शैचालय भांडे इ.

यापूर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- सदर ठिकाणी मागील ३ वर्षात काम झालेले नाही

जागेची मालकी :- वसई विरार शहर महानगरपालिका

अर्थसंकल्पीय तरतुद :- लेखाशिर्ष – प्रभाग समिती स्तरावरील विकास कामासाठी राखीव तरतुद

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 67 (3) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक हयांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस प्रस्ताव सविनय सादर.

P.

कामाबाबतचे बाबनिहाय वेळापत्रक

अ.क्र	बाब	अपेक्षित दिनांक
1	प्रशासकिय व वित्तीय मान्यता ठराव	सक्षम प्राधिकरणाकडुन मंजुरी मिळाल्यानंतर ताल्काळ
2	निविदा प्रसिद्धी करणे	१३/०६/२०२५
3	प्रथम लिफाफा उघडणे	२०/०६/२०२५
4	व्दितिय लिफाफा उघडणे	२७/०६/२०२५
5	संविदा ठराव मंजुरी	१०/०७/२०२५
6	कार्यादेश देणे /करारनामा करणे	१८/०७/२०२५
7	काम सुरु करणे	२१/०७/२०२५
8	काम पुर्ण करणे	२०/०८/२०२५
9	देयक सादर करणे	२५/०८/२०२५
10	देयकाचे प्रदान करणे	०१/०९/२०२५
11	उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे	०८/०९/२०२५

तरी प्रभाग समिती एच कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ९५ मध्ये कौलसिटी आणि चुळणा खलाटीपाडा येथील शौचालय दुरुस्ती करणे कामी बांधकाम विभामार्फत चालू राज्य दर सुची सन 2022-23 नुसार तयार केलेल्या रक्कम रु. २,९९,१७८/- अंदाजपत्रकास मा. आयुक्त तथा प्रशासक सो. हयांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस सविनय सादर.

ठराव :-

सदर काम खालील नमूद कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

कामाबाबतचे बाबनिहाय वेळापत्रक

अ.क्र	बाब	अपेक्षित दिनांक
1	प्रशासकिय व वित्तीय मान्यता ठराव	सक्षम प्राधिकरणाकडुन मंजुरी मिळाल्यानंतर ताल्काळ
2	निविदा प्रसिद्धी करणे	१३/०६/२०२५
3	प्रथम लिफाफा उघडणे	२०/०६/२०२५
4	व्दितिय लिफाफा उघडणे	२७/०६/२०२५
5	संविदा ठराव मंजुरी	१०/०७/२०२५
6	कार्यादेश देणे /करारनामा करणे	१८/०७/२०२५
7	काम सुरु करणे	२१/०७/२०२५
8	काम पुर्ण करणे	२०/०८/२०२५
9	देयक सादर करणे	२५/०८/२०२५
10	देयकाचे प्रदान करणे	०१/०९/२०२५
11	उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे	०८/०९/२०२५

सदर कामाकरिता नमुद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास संबंधित विभाग प्रमुख व त्यांचे अधिनस्त कर्मचारी हा MCSR १९७९ प्रमाणे कार्यवाहीस पात्र राहतील. तसेच सदर कामामध्ये काही अपरिहार्य कारणास्तव (तांत्रीक, नैसर्गिक व इतर सबक कारणास्तव) विलंब झाल्यास त्या-त्या वेळी विलंबास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घणे बंधनकारक राहील. तरी वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "एच" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ९५ चुळणे कौलसिटी आणि चुळणा खलाटीपाडा येथील शौचालय दुरुस्ती करणे कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,९९,१७८/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणेत येत आहे. तसेच त्यानुसार सदर कामाच्या अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची कार्यवाही करणेस व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे. तसेच Estimate मधील प्रत्येक टप्प्यावर केलेल्या कामाचे Geotagged फोटोग्राफ्स सादर करणेत यावे. तद्नंतरच कामाची रक्कम अदा करणेत यावी.

25/06

अनिलकुमार पवार (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका